देशदूत
www.deshdoot.com
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
बुधवार, दि. ७ मे २०२५


# ऑपरेशन सिंदूर विशेष

# धन्यवाद पीएम मोदी

पुणे । पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला पंतप्रधान नरेंद्र मोदी कधी घेणार? असा प्रश्न राजकीय नेत्यांसोबतच सर्वसामान्य नागरिकांना सुद्धा पडला होता. पण आता सर्व भारतीयांना आनंद देणारी बातमी समोर आली असून भारतीय सैन्याने बुधवारी (ता. ७ मे) मध्यरात्री १.३० वाजता पाकव्याप्त काश्मीरमध्ये एअर स्ट्राइक केले आहे. भारतीय सेनेच्या या खास मोहिमेसाठी ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले आहे. जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यामध्ये एकूण २६ जणांचा मृत्यू झाला होता. पुण्यातील मृत संतोष जगदाळे यांच्या कुटुंबाने प्रतिक्रिया दिली.



मोदींनी आमच्या भावना जाणून घेतल्या. आमच्या समोरच आमचे कुंकू त्या दहशतवाद्यांनी पुसले. गोळ्या घालून त्यांनी माझ्या नवऱ्याला मारले. त्यामुळे आज पंतप्रधान मोदींनी या स्ट्राइकला ऑपरेशन सिंदूर हे नाव दिले, त्यासाठी त्यांचे धन्यवाद, असे जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे यांनी म्हटले आहे. तर, आज खऱ्या अर्थाने माझ्या वडिलांना सरकारकडून श्रध्दांजली मिळाली आहे, अशी भावना कन्या आसावरी जगदाळे हिने व्यक्त केली आहे. १५ दिवसात मिशन पूर्ण केले त्यासाठी मी सरकारचे आभार मानते, ज्या २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांना आज श्रध्दांजली मिळाली आहे, अशी भावना यावेळी आसावरी जगदाळे हिने व्यक्त केली.



# आभारी आहे

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम मध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केलेल्या शुभम द्विवेदी यांच्या विधवा ऐश्यना द्विवेदी म्हणाल्या, मी खूप आभारी आहे. काश्मीरच्या इतिहासातील सर्वात भीषण हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुरू केलेल्या मऑपरेशन सिंदूरफया कोडनेमवर त्यांची प्रतिक्रिया होती.

मऑपरेशन सिंदूरफ हे नाव वाचताच शुभमचा फोटो पाहिला आणि मी रडू लागलो. या नावाने सरकारने आमच्याशी (पहलगाम हल्ल्यात ज्यांचे पती मारले गेले होते) वैयक्तिक पातळीवर संपर्क साधला आहे. आणि काही प्रमाणात आम्हाला वाटते की हा आमच्यावतीने घेण्यात आलेला सूड होता, असे सांगून त्या म्हणाल्या की, या नरसंहाराला भारताने दिलेल्या प्रतिक्रियेबद्दल मी खूप समाधानी आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर भारताने केलेल्या हल्ल्यात महत्त्वाकांक्षी दहशतवाद्यांचा खात्मा कसा झाला, याविषयी बोलताना ऐश्वर्याने हात जोडून मथँक यू सो सोफ असे म्हटले. इंडिया टुडे टीव्हीशी बोलताना ती म्हणाली, ममला भारतीय असल्याचा अभिमान वाटतो. रात्री दोन वाजता जाहीर करण्यात आलेल्या या अचूक हल्ल्यात नऊ दहशतवादी तळांवर ८० हून अधिक दहशतवादी ठार झाल्याची माहिती वरिष्ठ सुरक्षा सूत्रांनी इंडिया टुडेला दिली. हे कॅम्प जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनांशी संबंधित होते.

## माजी मिलीटरी अधिकारी प्रतिक्रिया

भारतातील पेहलगाम मधील निरपराध लोकांच्या विरोधात केलेल्या भ्याड कारवाईचा हा प्रतिसाद आहे. भारताचे हे चांगलं पाऊल आहे. बारकाईने केलेले नियोजन आणि त्याचअतिशय निर्धारित लक्षावर झालेला हल्ला आहे.त्यामुळे भारतीय सैन्य दलाचा अभिमान वाटावा असे हे कार्य आहे. याकारवाईत शंभर किलोमीटर पाकिस्तान हद्दीत असलेल्या अतिरेक्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला आहे. यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसामान्य नागरिक व सैन्य दलावर कुठेच धक्का लावण्यात आला नाही निर्धारित जागांवर अतिशय नियोजन पद्धतीने निवडक ठिकाणांवर हल्ला करण्यात आला आहे. यातून अतिरेक्यांचे प्रशिक्षण केंद्र उध्वस्त केले आहेत ही अभिमानाची बाब आहे.

■ मेजर जनरल सायरस पिठावाला(नि.)

भारतीय सैन्यदलाचे हे उत्तम पाऊल आहे. जैश मोहम्मद, हिजाबूलअशा विविध दहशतवादी संघटनांचे अड्डे उध्वस्त केले आहेत. कोणत्याही मिलिटरी कॅम्पला स्पर्श केलेला नाही. भारतीय संरक्षण दल मिसाईल आणि संरक्षण साहित्य यासारख्या प्रतिसादासाठी सज्ज आहेत. भारतीय संरक्षण विभागाला सैन्य दलावरही आक्रमण करता आला असता परंतु त्यांनी निवडक अतिरेकी अड्ड्यांवरच हल्ला करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारतीय सैन्यदलाची बाजू भक्कम आहे. त्यामुळे आपण आता वेट अँड वॉचची भूमिका स्वीकारली पाहिजे. पाकिस्तानने प्रेस मध्ये सांगताना भारताने कार्यवाही थांबवावी आम्ही कारवाई करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

■ ब्रिगेडियर जगदीश बागुल(नि.)

भारतीय सैन्य दलाने मोजून मापून नियोजनबद्ध निशाण्यावर केलेला हा हल्ला आहे. यातून भारताचा अतिरेक्यांविरुद्धच्या कारवायांचा एल्गार स्पष्ट होत आहे. पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहलगाममध्ये निष्पाप लोकांची हत्या केली, त्याचे प्रत्युत्तर या अतिरेक्यांना धडा शिकवून भारतीय सैन्याने दिला आहे. हा हल्ला फक्त आणि फक्त टेरेरिस्ट कॅम्पवर होता. भारत अतिरेक्यांना संपवेल ही भावना भारतीयांच्या मनात सरकारने स्पष्ट केली आहे. सर्वसामान्य जनतेवर कोणताही हल्ला न करता अतिरेक्यांना संपवणे हा उद्देश या कारवाईतून स्पष्ट केला आहे. भारतीय सैन्य दलाच्या अचूकतेबद्दल आणि केलेल्या कारवाईबद्दल निश्चितच अभिमान वाटत आहे.

■ मेजर जनरल पी. रमेश (नि.)

## आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया



अनेक जागतिक नेत्यांनी चिंता व्यक्त करत दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्यापासून संयुक्त अरब अमिरातीचे शेख अब्दुल्ला बिन जायद अल नाहयान यांनी भारत आणि पाकिस्तानला संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. दोन्ही देशांमधील शत्रुत्व लवकर संपेल, अशी आशा व्यक्त करीत आहे. नुकतेच त्याबद्दल ऐकले. मला वाटते लोकांना माहित होते की थोड्याफार भूतकाळाच्या आधारे काहीतरी घडणार आहे. ते बराच काळ भांडत होते. अनेक दशकांपासून ते लढत आहेत. हे लवकरच संपेल अशी आशा आहे. या दोनही देशांसाठी काही संदेश आहे का?, असे विचारले असता , नाही, मला आशा आहे की तो लवकर संपेल.

■ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर आपण बारीक लक्ष ठेवून आहोत. ममी भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. मी आज राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विधानाचा पुनरुच्चार करुन आशा करते की हे लवकर संपेल आणि शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या नेतृत्वाला सहभागी करून घेत राहणार आहोत.

■ अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ (मएक्सफवर पोस्ट)



दोन्ही देशांनी जास्तीत जास्त लष्करी संयम बाळगण्याचे आवाहन करीत आहे. गुटेरेस पाकिस्तानमधील भारतीय हल्ल्यांबद्दल खूप चिंतेत आहेत. मनियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे होणाऱ्या भारतीय लष्करी कारवायांबाबत खूप काळजी वाटते. दोन्ही देशांनी जास्तीत जास्त लष्करी संयम बाळगावा.

■ अँटोनियो गुटेरेस ,संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष जगाला परवडणारा नाही. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी या हल्ल्याचा निषेध केला असून, दोन्ही बाजूंनी संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. आम्ही भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना शांतता आणि स्थैर्याला प्राधान्य देण्याचे, शांत आणि संयमी राहण्याचे आणि परिस्थिती अधिक गुंतागुंतीची करणारी कारवाई टाळण्याचे आवाहन केले आहे.

■ चीनच्या परराष्ट्र मंत्रालय प्रवक्त्ये

दोन्ही देशांना चर्चेच्या माध्यमातून परिस्थिती स्थिर करण्याचे आवाहन केले. पेहलगाममधिल दहशतवादी कृत्याचा निषेध करताना, दि.२२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये घडलेल्या दहशतवादी कृत्यासंदर्भात आमचा देश अशा दहशतवादी कारवायांचा तीव्र निषेध करीत आहे. शिवाय, या परिस्थितीमुळे आणखी प्रत्युत्तरात्मक देवाणघेवाण होऊ शकते आणि संपूर्ण लष्करी संघर्षात रूपांतर ती होऊ शकते, अशी तीव्र चिंता आहे. दक्षिण आशियातील शांतता आणि स्थैर्यासाठी आम्ही भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आणि चर्चेद्वारे परिस्थिती स्थिर करण्याचे आग्रही आवाहन करतो.

■ योशिमासा हयाशी,जपानचे मुख्य कॅबिनेट सचिव

संयुक्त अरब अमिरातीने भारत आणि पाकिस्तानला सीमेवर संयम बाळगण्याचे आणि तणाव कमी करण्याचे आवाहन केले. लष्करी वाढ रोखण्यासाठी, दक्षिण आशियातील स्थिरता मजबूत करण्यासाठी आणि पुढील प्रादेशिक तणाव टाळण्यासाठी संवाद आणि परस्पर समंजसपणाचे आवाहन करणाऱ्यांकडे लक्ष देणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

■ युएईचे शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान

यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणात पेहलगाम दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि त्यांच्या समर्थकांना न्यायाच्या चौकटीत आणले पाहिजे. यावर भर दिला होता. विशेष म्हणजे, संभाषणादरम्यान क्रेमलिनने जारी केलेल्या वाचनात संयम किंवा राजनैतिक मार्गांचा वापर करण्याचा कोणताही उल्लेख नव्हता.

■ रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन

## स्थानिक प्रतिक्रिया

भारतीय सैन्याने अत्यंत नियंत्रित आणि परिणामकारक हल्ले करून अतिरेक्यांना योग्य तो धडा शिकवल्याबद्दल सैन्याच अभिनंदन. पाकिस्तानातील सामान्य नागरिकांना कोणतीही हानी न होता अतिरेकी ठिकाण उद्व्स्थ करण्यात आली आहे. दोषींना सोडायचं नाही आणि निरपराधांना मारायच नाही ही भारतीय परंपरा आपल्या लष्करानं कायम राखली ही अभिमानास्पद बाब आहे तसेच देशाची मान उंचावणारी देखील बाब आहे. सैन्यदलाला योग्य वाटेल ती कार्यवाही करण्याची मुभा देणाऱ्या केंद्र सरकारचे देखील अभिनंदन.थेट युद्ध होण्याची शक्यता कमी आहे पण समजा युद्धाचा निर्णय सरकारनं घेतलाच तर भारतीय म्हणून आपण सगळे सरकार सोबत राहू.

■ - राजाभाऊ वाजे, खासदार, नाशिक लोकसभा

आज पहाटे १.३० वाजता आपल्या भारतीय सेनेच्या तीनही दलांनी संयुक्तपणे पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदुर या सार्थ नावाने केलेल्या या ऑपरेशनला यशस्वीपणे पूर्ण केलेल्या आपल्या सैन्यदलातील सर्वांचे तसेच हे ऑपरेशन करण्यास आपल्या सैन्यदलावर पूर्ण विश्वास दाखवणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मनापासून अभिनंदन. जय हिंद ! भारत माता की जय

■ - सिमा हिरे, आमदार,नाशिक पश्चिम

भारतीय लष्कराने केलेली कारवाई योग्यच आहे. आपल्या नागरिकांवर बाहेरून आलेल्या अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याला आपल्या लष्कराने चोख उत्तर दिले आहे. पाकिस्तानात असलेले दहशतवादी अड्डे उध्वस्त करण्यात आपल्या लष्कराचे मोठे योगदान आहे. नागरिकांच्या वतीने लष्कराचे मनापासून आभार.

■ - भास्कर भगरे, खासदार दिंडोरी, लोकसभा

# भारतीय लष्कराचे अभिनंदन...!

भारतीय सैन्यदलाने अत्यंत नियंत्रित, योजनाबध्द, परिणामकारक हल्ले करून अतिरेक्यांना योग्य तो धडा शिकविला यासाठी भारतीय लष्कराचे मनःपूर्वक अभिनंदन. दोषींना सोडायचं नाही आणि निरपराधांना मारायचं नाही ही भारतीय परंपरा आपल्या लष्करानं कायम राखली ही अभिमानास्पद बाब आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा देश भक्तांचा पक्ष आहे. आम्ही सदैव देशाच्या सोबत असून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी आम्हीही तयार आहोत. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप लोकांना ही खरी श्रद्धांजली आहे.

■ संदेश फुले, उपमहानगर प्रमुख,शिवसेना (ठाकरे गट)

भारताने मध्यरात्री केलेली कारवाईचे स्वागतच. मात्र भारताने एकाच वेळेला पाकिस्तानच्या सर्व मुख्य अड्ड्यांवर हल्ले करून पाकिस्तानलाच नष्ट करायला पाहिजे आहे, त्याची आम्ही वाट बघत आहोत. इस्लामाबाद मध्ये तिरंगा फडकला पाहिजे अशी कारवाई करायला हवी.

■ माजीद पठाण (युवा समाजसेवक)

भारतीय सैन्याचे मनापासून अभिनंदन. पाकिस्तानला अशाच प्रकारे धडा शिकवण्याची गरज होती, तर यापेक्षा अधिक भयंकर इलाज त्याचा करावा लागेल त्याशिवाय हे रोग जाणार नाही.

■ - रफिक शेख

केंद्र सरकारचे तसेच भारतीय सैन्याचे अभिनंदन. सुरुवातीला असं वाटलं होतं की पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी उशीर होत आहे, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चोख नियोजन करुन आज पाकिस्तानला चोख धडा शिकवला. आता यापुढे भारतात असे उद्योग करायची हिम्मत पाकिस्तान करणार नाही. आज आदेश संपूर्ण देश पंतप्रधान नरेंद्र मोदी, आपले सैन्य दल व केंद्र सरकारच्या पाठीशी उभा आहे.

■ हाजी शोऐब मेमन

# कसे राबवले ऑपरेशन सिंदूर

## पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी काय सांगितलं?




दिल्ली । जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर अखेर भारताने जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय लष्कर आणि हवाई दलाने पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करून त्यांना धक्का दिला आहे. या कारवाईत जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा आणि टीआरएफसारख्या दहशतवादी संघटनांचे अड्डे उद्धस्त करण्यात आले आहेत.

२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरमधील शांततामय पर्यटनस्थळ असलेल्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेने देशभरात संतापाची लाट उसळली होती. पाकिस्तान-प्रेरित दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याचे स्पष्ट झाले होते. याची जबाबदारी द रेसिस्टन्स फ्रंट (ढठऋ) या दहशतवादी संघटनेने घेतली होती. ढठऋ ही लष्कर-ए-तोयबाशी संबंधित संघटना आहे.

या हल्ल्यानंतर देशभरातून पाकिस्तानविरोधात कठोर कारवाईची मागणी सुरू होती. अखेर बुधवारी भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील ९ दहशतवादी अड्ड्यांवर हवाई हल्ला केला. या मोहिमेची माहिती देण्यासाठी एक संयुक्त पत्रकार परिषद घेण्यात आली होती. पत्रकार परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री, हवाई दलातील विंग कमांडर व्योमिका सिंग आणि लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी संयुक्तरित्या माहिती दिली. विशेष म्हणजे या कारवाईत दोन महिला अधिकाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.

कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, या कारवाईचे उद्दिष्ट केवळ दहशतवादी तळ उद्धस्त करणे होते. आम्ही विशेष काळजी घेतली की कोणत्याही निष्पाप नागरिकाला इजा पोहोचू नये. हा अत्यंत अचूक आणि नियोजित हल्ला होता. या ठिकाणांवर टार्गेटेड हल्ले करण्यात आले असून, सर्व अड्डे उद्धस्त झाल्याची माहिती लष्कराने दिली आहे. या कारवाईदरम्यान कोणत्याही लष्करी तळावर हल्ला करण्यात आलेला नाही आणि नागरिकांचेही नुकसान टाळण्यात आले आहे. ही कारवाई अत्यंत काळजीपूर्वक आणि अचूकतेने करण्यात आली. लष्कराच्या गुप्तचर यंत्रणांनी हल्ल्यात सहभागी दहशतवाद्यांची ओळख पटवली होती. त्यानंतर हल्ल्याची वेळ, मार्ग आणि लक्ष्य यांचे बारकाईने नियोजन करण्यात आले. विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितले की, आम्ही फक्त दहशतवाद्यांना लक्ष्य केले. कोणत्याही नागरिकाचे नुकसान होणार नाही याची आम्ही पूर्ण काळजी घेतली.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले की, पहलगाम हल्ला हा भारताच्या प्रगतीच्या विरोधात पाकिस्तानने उभं केलेलं षड्यंत्र होतं. जम्मू आणि काश्मीरमध्ये पर्यटन आणि अर्थव्यवस्था वाढते आहे. हेच पाकिस्तानला खटकते आणि म्हणून त्यांनी हा हल्ला घडवून आणला, असं ते म्हणाले. पाकिस्तानने हल्ल्यानंतरही कोणतीही दहशतवाद्यांविरोधात कारवाई न करता उलट भारतावर आरोप केले. त्यामुळे भारताला स्वतःची सुरक्षा आणि विकास सुनिश्चित करण्यासाठी ही कारवाई करावी लागली, असंही त्यांनी नमूद केलं.

या कारवाईनंतर पाकिस्तानवरील आंतरराष्ट्रीय दबाव वाढण्याची शक्यता आहे. विक्रम मिस्री यांनी सांगितले की, पाकिस्तान हे दहशतवाद्यांचे सुरक्षित आश्रयस्थान म्हणून जगात ओळखले जाते. हे थांबवण्यासाठी भारताला पावले उचलावी लागली. या कारवाईमुळे भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे की, दहशतवादाविरोधात तो कोणतीही तडजोड करणार नाही. भारत शांततेच्या मार्गावर आहे, पण जर कोणी त्याच्या सुरक्षेला आव्हान दिलं, तर त्याला कठोर प्रत्युत्तर दिलं जाईल.


**तसेच राहुल गांधी यांनीही ट्वीट करत याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. मला आपल्या सैन्य दलाचा अभिमान वाटत असल्याचे सांगितले.**

**त्यासोबतच संजय राऊत यांनी जय हिंद! असे म्हणून भारतीय सैन्यदलाचा सन्मान केला.**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ 'जय हिंद! जय हाय की सेना!' असे ट्विट केले. आणि केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी गोयल यांनी 'भारत माता की जय' अशी प्रतिक्रीया व्यक्त केली. पाकिस्तानमधील नऊ ठिकाणांवर भारताच्या लष्करी हल्ल्यांनंतर जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. हे हल्ले 'ऑपरेशन सिंदूर' चा एक भाग, पहलगाममधील प्राणघातक दहशतवादी हल्ल्याचा थेट बदला होता अशी प्रतिक्रीया व्यक्त करण्यात आल्या आहेत.
राजनाथ सिंह यांनी 'भारत माता की जय' या घोषणेने राष्ट्रीय अभिमान व्यक्त केला.

भारताच्या मऑपरेशन सिंदूर इंडियाफ अंतर्गत, काल रात्री भारताने पुन्हा एकदा दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर जबरदस्त हवाई कारवाई केली. पाकिस्तानला कानोकान खबर होऊ न देता भारतीय सैन्याने बुधवारी (ता. ७ मे) मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील एकूण ९ दहशतवादी तळांना लक्ष्य केले. यामध्ये अनेक दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याची माहिती समोर येत आहे. भारतीय सैन्याने केलेल्या या हल्ल्याचे शरद पवार यांनी कौतुक केले आहे.

त्यांनी पहिल्यांदाच पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचे कौतुकही केले. भारतीय नेतृत्व आणि भारतीय सेना यांच्यामध्ये कोणतेही अंतर नाही हे जगाला कळले. आज सगळा देश एअर फोर्सच्या पाठीमागे आहे, या सोबतच हा हल्ला करताना भारत आक्रमक झालेला नाही, याची काळजी आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली, असे म्हणत पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सैन्याच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.



cmyk